

संस्कृत साहित्य सरिता

मालती माधव

संस्कृत
साहित्य
सरिता
: ८

भवभूति-कृत

मालतीमाधव

कथासार
अमरेन्द्र

वोरा अँन्ड कंपनी, पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अँन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
पहिली आवृत्ती : १९५६

मुद्रक :
अनंत चिंतामण रायरीकर
' स्वस्तिक मुद्रणालय '
४३९ शनवार पेठ, पुणें २

संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. ‘ संस्कृत-साहित्य-सरिता ’ असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार ? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

—प्रकाशक

परिचय

आठव्या शतकांत भवभूति नांवाचा एक कवि होऊन गेला. भारताच्या महाकवींत याची गणना होते. भवभूतीनें केवळ तीनच नाटकें लिहिलीं. त्यांतील पहिलीं दोन रामकथेवर आधारलेलीं आहेत– 'महावीरचरित' आणि 'उत्तररामचरित'. 'मालतीमाधव' हें त्याचें तिसरें नाटक स्वतंत्र सामाजिक नाटक आहे. इसवी सनाच्या आठव्या शतकांत लिहिल्या गेलेल्या या नाटकांत त्या वेळच्या समाजाचें चित्र उमटलेलें दिसतें. ही एक प्रेमकथा आहे, परंतु त्यांत अनेक उदात्त स्वभावाच्या व्यक्तींची ओळख होते. आपल्या देशांत जुन्या काळींहि सहशिक्षण होतें आणि स्त्रिया समाजशिक्षणाचें व्रत घेऊन आमरण तें चालवीत असत. अशा कांहीं गोष्टींचाहि पुरावा यांत मिळतो. आज शेकडों वर्षें लोटलीं तरी भवभूतीच्या नाटकांची गोडी कांहीं कमी झालेली नाहीं.

—लेखक

मालतीमाधव

तें एक मोठें विद्यापीठ होतें. पुष्कळ दूरदूरचे विद्यार्थी विदर्भ देशांतील पद्मावती नगराजवळील या प्रसिद्ध विद्यापीठांत शिक्षण घेण्यासाठीं येत. जसे ते तेथें येत तसेच शिक्षण आटोपल्यानंतर साहजिकच आपापल्या ठिकाणीं परत जात. त्यांत विद्यार्थिनींची संख्याहि कांहीं अगदींच लहान नव्हती. त्याहि शिक्षण पुरें होतांच आपल्या घरीं परत जात.

परंतु कामंदकी व सौदामिनी या तेथील दोन विद्यार्थिनी मात्र शिक्षण संपल्यानंतरहि आपल्या गांवीं परत जाणार नव्हत्या. त्या दोघींनींहि विवाह न करतां आजन्म विद्यादान करीत राहाण्याचें ठरविलें होतें.

पद्मावतीच्या विद्यापीठांत या दोघी शिकत असतांना आणखीहि पुष्कळ विद्यार्थी–विद्यार्थिनी तिथें होत्याच. पण त्यांतल्या दोघां विद्यार्थ्यांचा यांच्याशीं विशेष स्नेह जडला होता. त्यांतल्या एकाचें नांव भूरिवसू; आणि दुसरा देवरात. त्यांना एकमेकांविषयीं फार प्रेम वाटे. पुष्कळ वर्षें एकत्र राहिलेलीं, एकत्र खेळलीं-शिकलेलीं त्यामुळें तसें होणें अगदीं साहजिकहि होतें. त्यांचे तेथील दिवस मोठ्या आनंदांत गेले; आणि अर्थातच ते कांहीं वर्षांनंतर संपलेहि.

पद्मावतीचा अभ्यासक्रम पुरा करून देवरात आपल्या नगराला परत जावयास निघाला. भूरिवसू पद्मावतीलाच राहाणार होता, तरी तोहि विद्यापीठ सोडणारच होता. कामंदकी व सौदामिनी यांना कांहीं कोठें दूर जावयाचें नव्हतें. तरीपण इतकीं वर्षें एकमेकांच्या सहवासांत प्रेमानें नांदलेलीं तीं चारी माणसें आतां एकमेकांपासून दूर होणार होतीं. कदाचित तीं पुन्हा परस्परांना कधीं भेटणारहि नव्हतीं. त्यामुळें एकमेकांचा निरोप घेतांना साऱ्यांचे कंठ दाटून आले. देवरात भावनेच्या भरांत म्हणाला, "आपण आतां पुन्हा एकमेकांना कधीं भेटणार कोण जाणे ? पण माझ्या मनांत एक कल्पना आली आहे ती सांगतों." भूरिवसूला उद्देशून त्यानें म्हटलें, "आपल्या मुलांच्या विवाहसंबंधानें आपला हा स्नेह कायम राखावा असें माझ्या मनांत आहे. मला मुलगा झाला व भूरिवसूला मुलगी झाली किंवा भूरिवसूला मुलगा व मला मुलगी झाली तर एकमेकांनीं आपला मुलगा किंवा मुलगी दुसऱ्याच्या मुलीला किंवा मुलाला द्यावी."

"छान, मला ही योजना कबूल आहे," भूरिवसूनें तत्काळ त्या बेताला संमती दिली. कामंदकीलाहि तिच्या दोन मित्रांचा हा विचार फार आवडला.

"मी आणि सौदामिनीहि ह्या लग्नाला अवश्य येऊं. इतकेंच नव्हे तर लागेल ती मदतहि करूं" कामंदकीनें सौदामिनीच्याहि वतीनें सांगून टाकलें. त्या मंगलप्रसंगीं

पुन्हा एकत्र जमून सुखदु:खाच्या गोष्टी करण्यांत किती आनंद असेल याची कल्पना करीत चौघांनीं एकमेकांचा निरोप घेतला.

* * *

भूरिवसूनें पद्मावतीच्याच राजाच्या दरबारीं नोकरी पत्करली. तो अति बुद्धिमान होता, तसाच मोठा प्रामाणिकहि होता. त्याच्या या गुणांमुळें तो राजाच्या मर्जीला उतरून चढत चढत मुख्य प्रधानकीच्या जागेवर जाऊन बसला. कामंदकीनें पद्मावतीजवळच आश्रम स्थापन करून स्त्रियांना शिक्षण देण्याचें कार्य सुरू केलें. तिनें बुद्ध भिक्षुणीची दीक्षा घेतली होती. अनेक शास्त्रांत निपुण असलेल्या या कामंदकीपाशींच राहून सौदामिनीनेंहि आणखी कांहीं वर्षें विद्याभ्यासांत घालविलीं. अखेर ती योगशास्त्राच्या अभ्यासासाठीं श्रीपर्वतावर जाऊन राहिली. देवरात मात्र तेथून निघाला तो थेट आपल्या देशांत परत आला. त्यानेंहि कुंडलपुरच्या राजाच्या पदरीं नोकरी पत्करली. आणि तोहि भूरिवसूप्रमाणेंच कांहीं काळानंतर तेथील मुख्य प्रधान बनला.

बोलाफुलाला गांठ पडावी तसें होऊन देवराताच्या शब्दाप्रमाणें भूरिवसूला मुलगी झाली आणि स्वत: देवराताला झाला मुलगा. अर्थात् देवराताला आपला संकल्पित बेत सिद्धीला जावा असें वाटत असल्यास काय आश्चर्य!

देवराताच्या मुलाचें नांव माधव. मोठा हुषार व तरतरीत

होता तो. बुद्धींत तसाच शक्तींच्या कामांतहि तो पटाईत झाला. वीस वर्षांचा होईपर्यंत कुण्डलपुरांत वडिलांजवळ राहूनच त्यानें विद्या संपादन केली. परंतु माधवानें पुढील उच्च शिक्षण घ्यावें असें देवराताच्या मनांत असल्यानें त्यानें त्याला आपण पूर्वी शिकत असलेल्या पद्मावतीच्या विद्यापीठांत पाठविण्याचें ठरविलें. त्याकाळीं पद्मावतीची तशी ख्यातीच होती.

कुण्डलपूर राज्याच्या सेनापतीचा मुलगा मकरंद हा या माधवाचा बालमित्र होता. त्याच्यासहच देवरातानें माधवची रवानगी पद्मावतीला केली. शिवाय आपल्या कुटुंबांतील विश्वासू व तरुण सेवक कलहंस यालाहि त्यांच्याबरोबर देण्यास तो विसरला नाहीं. तरीपण देवराताला वाटत होतें कीं, इतक्या दूर ठिकाणीं आपल्या मुलाला पाठवावयाचें तेव्हां त्याची काळजी घेणारें तेथें कोणी असलें तर बरें. त्याला साहजिकच आठवण झाली कामंदकीची-आपल्या जुन्या मैत्रिणीची. ती पद्मावतीच्या अगदीं जवळच राहात होती. तेव्हां देवरातानें या मुलांची काळजी घेण्याविषयीं कामंदकीला विनंती केली. कामंदकीनें ती अगदीं आनंदानें मान्य केली.

माधव व मकरंद दोघेहि मोठ्या गोड व प्रेमळ स्वभावाचे होते. पद्मावतीला आल्यापासून ते कामंदकीला भेटण्यासाठीं तिच्या आश्रमांत वारंवार येत. कामंदकीला त्यांचा स्वभाव आवडला आणि त्यांच्यावर तिची फार माया जडली. ती त्यांना अतिशय प्रेमानें वागवी, तशीच त्यांच्या

शिक्षणावरहि डोळसपणानें नजर ठेवी. माधवहि वडिलांच्या या जुन्या मैत्रिणीला फार मानी व तिच्या सांगण्याबाहेर कधीं जात नसे.

माधव मकरंदाला बरोबर घेऊन कामंदकीच्या आश्रमांत नेहमीं जात येत असे. तेथें कामंदकीच्या बोलण्यांत एका मुलीचा वारंवार उल्लेख होई. तिचें नांव होतें मालती. ती कोणाची कोण हें कामंदकीनें माधवाला प्रारंभीं स्पष्ट करून सांगितलें नाहीं; तरी तिच्या सौंदर्याविषयीं व सद्‌गुणाविषयीं कामंदकी नेहमींच गौरवपर बोले. माधव आपल्या गुणरूपामुळें जसा कामंदकीचा आवडता झाला होता. तशीच ही मालतीहि पण. खरें म्हणजे मालतीच्या बालपणापासूनच कामंदकीला तिचा फार लळा लागलेला होता. ती कामंदकीच्या आश्रमांत नेहमीं यायची; आणि कामंदकीहि तिच्या घरीं अधूनमधून जायची.

त्या दोघींचे इतकें निकट संबंध येण्याचें कारणहि तसेंच होतें. कामंदकीचा बालमित्र भूरिवस हा पद्मावतीचा मुख्य प्रधान झाला होता तरी जोगीण बनलेल्या कामंदकीला विसरला नव्हता. या भूरिवसूचीच मालती ही मुलगी. भूरिवसूची मुलगी म्हणून कामंदकीला तिच्याविषयीं प्रेम होतेंच; परंतु त्याशिवायहि त्याला आणखी एक महत्त्वाचें कारण होतें. आणि याच कारणामुळें माधवाविषयींहि कामंदकीला विशेष आस्था वाटे.

पद्मावतीचें विद्यालय सोडतांना देवराताला भूरिवसूनें दिलेला शब्द हेंच याचें मुख्य कारण होतें. आणि तो शब्द

पाळण्याचें मनांत असूनहि एक चमत्कारिक संकट त्याच्या मार्गांत येऊन उभें होतें.

* * *

कामंदकीची शिष्या अवलोकिता म्हणून होती. मोठी चतुर आणि धोरणी स्त्री. पण थोडीशी फटकळच. एकदा कामंदकीनें तिला सहज म्हटलें, " वत्से, मालती-माधवांचा विवाह घडून येईल ना ? माझी मनीषा पुरी होईल ना?"

" भगवती, आपण स्वतः सगळ्या सांसारिक सुखांकडे पाठ फिरविलीत, विरागी झालांत आणि मालती-माधवाच्या विवाहाची काळजी आपण कशी करतां हें कांहीं समजत नाहीं ! " अवलोकितेनें स्पष्टच विचारलें.

तेव्हां मात्र कामंदकीला सगळा जुना इतिहास आणि त्याचे नवे धागेदोरे आपल्या शिष्येला समजावून देणें भागच पडलें. भूरिवसूनें आपल्याला मुलगी झाल्यास आणि देवराताला मुलगा झाल्यास आपली मुलगी देवराताच्या मुलाला देण्याचें वचन दिलेलें आहे. पण तें वचन पाळण्याच्या बाबतींत तो कसा अडचणींत आला आहे तेंहि तिनें अवलोकितेला सांगितलें. पद्मावतीच्या राजाचा आवडता व श्रीमंत वयस्कर सरदार नंदन याच्या मनांत मालती भरली होती; आणि त्याला ती मिळावी अशी सूचना राजानें भूरिवसूपाशीं केली होती. अर्थातच राजाच्या मनाविरुद्ध जाणें भूरिवसूला कठीण होतें. म्हणून तो असें पाहात होता कीं मालतीनें माधवाला परस्पर वरलें आणि

त्यांनीं एकमेकांच्या संमतीनें प्रेमविवाह केला तर बरें. त्यामुळें भूरिवसूनें दिलेला शब्दहि खरा होणार होता आणि त्या प्रकरणांतून अंग झटकून मोकळें होऊन राजाच्या गैरमर्जीपासूनहि तो वांचत होता.

पण हें घडावें कसें ? यासाठींच त्यानें आपली लहानपणींची मैत्रीण कामंदकी हिची मदत घेण्याचें ठरविलें आणि कामंदकीनें ती देण्याचेंहि आनंदानें पत्करलें. कामंदकी विरक्त वृत्तीनें राहणारी जोगीण असल्यामुळें तिला आपली कामगिरी फारशी अडचण न येतां पार पाडणें शक्य होतें.त्या जोगिणीचा या बाबतींत कोण संशय घेणार!

ही सगळी हकीकत सांगून झाल्यावर कामंदकीनें मालती-माधवांची एकत्र गांठ पडून त्यांचा प्रेमसंबंध जमवून आणण्याची नाजुक कामगिरी अवलोकितेकडेच सोंपविली.

वसंत ऋतु लागला. नगराबाहेरील उद्यानांत मदन–महोत्सवाची तयारी झाली. या उत्सवांत लोक मोठ्या उत्साहानें भाग घेत. अवलोकितेनें मालतीला या उत्सवाकरितां मदनोद्यानांत जाण्याचा आग्रह केला. माधवालाहि तिनेंच आग्रह करून उत्सव पाहाण्यासाठीं जायला लावलें.

मालती आपल्या सख्या व दासी यांच्यासह उद्यानांत मौज पाहात हिंडत होती. माधवहि पुष्कळ फिरला आणि दमून एका बकुळीच्या झाडाखालीं बसला. झाडाखालीं फुलांची पखरण झाली होती. माधवाला हार गुंफण्याची कलाहि चांगली अवगत होती. त्यानें बसल्या बसल्या तीं फुलें गोळा केलीं आणि सहज त्याचा एक सुंदर हार बनवून तो गळ्यांत घातला.

इतक्यांत कामदेवाच्या मंदिरांत दर्शनाला गेलेली मालती तेथून बाहेर पडली. तिच्या मैत्रिणीहि तिच्याबरोबर होत्या. माधव ज्या बकुळीच्या झाडाखालीं बसला होता तेथून तें मंदिर जवळच होतें. त्यामुळें त्या एकमेकींत कुजबुजत जात असतांना माधवाचें लक्ष तिकडे गेलें. मालतीचें अनुपम सौंदर्य पाहून तो वेडा होऊन गेला. मालतीहि त्याच्याकडे पाहात पाहात तेथून निघाली आणि आपल्या अंबारींत बसून घराकडे परतली.

माधवाला आपण पाहिली ती सुंदर तरुणी कोण हें माहीत नव्हतें. तरीपण तिनें त्याचें चित्त चोरून नेल्यामुळें तो तिचाच विचार करीत बसला होता. इतक्यांत मालतीची सखी लवंगिका तेथें परत आली. तिनें जवळ येऊन माधवाला नमस्कार केला आणि म्हटलें कीं, "महाभाग, किती सुंदर बकुळमाला आहे ही तुमच्या गळ्यांत. दोरा एकसारखा असल्यामुळें फुलांची गुंफणहि एकसारखी जमली आहे. त्यामुळें ती फारच सुंदर दिसते आहे. आमच्या ताईसाहेब तर ही माला पाहून अगदीं मोहून गेल्या आहेत तीवर. देतां का ही माळ आमच्या ताईसाहेबांसाठीं ?"

माधवानें उलट विचारलें कीं, या तुझ्या ताईसाहेब कोण ? तुझें नांव काय ?

तेव्हां लवंगिकेनें सांगितलें कीं, मगाशीं थोड्या वेळापूर्वी येथून गेलेली जी तरुणी त्याच आमच्या ताईसाहेब. अमात्य भूरिवसूची ती मुलगी. मालती तिचें नांव. आणि मी तिची सखी लवंगिका.

माधवाला मालतीचें नांव कळतांच तो आनंदांत चूर होऊन गेला. मोठ्या उत्साहानें त्यानें ती बकुळीची माळ आपल्या गळ्यांतून काढून लवंगिकेपाशीं दिली. आणि तिला हेंहि बजावलें कीं, माळ तुझ्या ताईसाहेबांना आवडली कीं नाहीं तें पुन्हा भेटशील तेव्हां जरूर मला सांग.

मालतीचेंहि प्रेम आपल्यावर आहे, हें आतां माधवाला कळून चुकलें. 'पण तिची प्राप्ति कशी होणार?' याच विचारांत तो उदासवाणा होऊन बसला होता. तेवढ्यांत त्याचा मित्र मकरंद तेथें येऊन उभा राहिला. त्यानें माधवाचा उदास चेहरा पाहून साहजिकच चौकशी केली. त्याला जेव्हां हें सगळें प्रेमप्रकरण कळलें तेव्हां तो आनंदला. कारण कामंदकीच्या तोंडून त्यानें मालतीचें गुणवर्णन पूर्वीं अनेकदां ऐकलेलें होतें. मात्र त्याला एक निराळीच काळजी वाटूं लागली. मालतीचें लग्न भूरिवसूनें नंदनाशीं ठरविलें असल्याची बातमी त्याला समजलेली होती. त्यामुळें आतां आपल्या मित्राला मालती कशी मिळणार, या विचारानें तो अस्वस्थ होऊन गेला.

माधवाला तर हुरहुर लागलेलीच होती. तो आपल्या मित्राला म्हणाला, "अर्थाअर्थीं कांहीं कारण नसतांना अगदीं सहजच मी मालतीच्या प्रेमपाशांत सांपडलों आहे. पूर्वजन्मींचा काय ऋणानुबंध असेल तो असो. माणसांच्या सुखदु:खाचें कारण खरोखरी नशीबच आहे. सारें कांहीं दैवाधीन असतें हेंच खरें."

परंतु मकरंदानें त्याचें बोलणें खोडून काढीत म्हटलें, " मित्रा, प्रेमांत स्वार्थ असतो हें म्हणणेंच बरोबर नाहीं. नाहींतर सूर्य उगवतांच कमळें उमलावींत आणि चन्द्र प्रकाशूं लागतांच चन्द्रकान्त मणी पाझरूं लागावा याचें तरी कारण काय ?"

"असेल, त्यांतहि कांहीं हेतु असेल," असें यावर माधवानें उत्तर दिलें. परंतु मकरंदानें म्हटलें कीं, " याला कारण प्रेमच. या प्रेमाला दुसरें कांहीं कारण लागत नाहीं. त्याचें वर्णनहि करतां येत नाहीं." मकरंदाच्या दृष्टीनें मालती-माधवांचें प्रेम अशा प्रकारचेंच होतें.

त्यांचें इतकें बोलणें होत आहे तों माधवाचा नोकर कलहंस घाईघाईनें तेथें आला. त्याच्या हातांत एक चित्र होतें. तें माधवाच्या हातीं देत तो म्हणाला कीं, तुमचें अंतःकरण जिनें आपल्याकडे ओढून नेलें आहे तिनेंच काढलें आहे हें चित्र.

मालतीनें आपलें चित्र काढलें हें समजून आल्यामुळेंच माधवाला किती बरें वाटलें. आपल्याप्रमाणेंच तिच्याहि मनांत आपल्याविषयीं प्रेम उत्पन्न झालें आहे याची त्याला आतां खात्री पटली. खरोखरी तसेंच झालें होतें. लवंगिकेनें जी बकुलमाला माधवाजवळून मागून नेली ती मालतीच्या हातीं आली. तेव्हांपासून तिला माधवाशिवाय दुसरें कांहीं दिसेनासेंच झालें. त्यामुळें तिनें स्वतःच काढलेलें चित्र आपलें मन रंजविण्यासाठीं दृष्टीसमोर धरलें. लवंगिकेलाहि तिनें तें दाखविलें. लवंगिकेची मैत्रीण मंदारिका म्हणून

एक दासी होती. या मंदारिकेवर माधवाचा नोकर कलहंस याचें प्रेम जडलेलें होतें. त्यामुळें त्या दोघांच्या भेटी वारंवार होत. अशाच एका भेटींत मंदारिकेच्या हातीं आपल्या धन्याचें चित्र कलहंसाला दिसलें. लगेच कलहंसानें संधी साधून तें तेथून पळविलें. आणि आतां माधव व मकरंद बोलत बसले असतांना नेमकें तेथेंच तो तें घेऊन आला होता.

या प्रेमाची परत-भेट व्हावयासच हवी असें ठरवून माधवानें त्याच चित्रफलकाच्या पाठीवर स्वतःच्या हातांनीं मालतीचें सुंदर चित्र रंगविलें. त्याखालीं त्यानें एक श्लोकहि लिहून ठेवला : "मनोहर वस्तु जगांत इतर अनेक असतील; पण चांदण्याप्रमाणें माझें मन मोहविणारी हीच एक आहे."

माधवाचें चित्र काढून पुरें होतें न होतें तोंच कलहंसाची प्रेयसी मंदारिका लगबगीनें तेथें आली. तिनें आल्याबरोबर त्या चित्रफलकाचीच चौकशी कलहंसापाशीं केली. कलहंसानेंहि खरी हकीकत सांगून तो चित्रफलक तिला परत दिला. मंदारिकेनें तो दोन चित्रांचा चित्रफलक पुन्हा परत लवंगिकेकडे आणला. लवंगिकेनें मालतीच्या हातीं तो देतांच मालतीला आपल्या प्रेमाला योग्य उत्तर मिळालें असें वाटलें.

* * *

कृष्णचतुर्दशीच्या दिवशीं पद्मावतीजवळ असलेल्या शिवालयांत मोठी गर्दी होई. या पुण्यदिवशीं स्वतःच्या

हातांनीं फुलें तोडून शंकराची पूजा केली म्हणजे स्त्रियांचें सौभाग्य अखंड राहातें अशी श्रद्धा होती. नित्यक्रमाप्रमाणें याहि शिवरात्रीला मालती आपल्या आईबरोबर शंकराच्या दर्शनासाठीं देवळांत आली होती. माधवानेंहि त्या दिवशीं शिवालयांत यावें अशी व्यवस्था कामंदकीनें केली होती. त्याप्रमाणें माधव तेथें येऊन देवळाजवळील बागेंत एका अशोक वृक्षापाशीं बसून राहिला.

मालती बागेंत हिंडून फुलें गोळा करीत होती. कामंदकीहि त्यावेळीं तेथें आलेली होती. तिनें मालतीपाशीं बोलतां बोलतां माधवाचा विषय काढला.

"मदनोद्यानांतील भेटीपासून माधव अगदीं बेचैन होऊन गेला आहे. मला तर त्याची भीतीच वाटते. एखादवेळीं आपल्या जिवाचें बरें वाईटसुद्धां करून घ्यायचा तो या हृदयव्यथेनें." कामंदकीनें माधवाच्या मनाची स्थिति मालतीला समजावून सांगितली.

मालतीची मन:स्थितिहि यापेक्षां कांहीं वेगळी नव्हती. माधव अशोक वृक्षापाशीं बसून हें सारें ऐकत होताच. त्यांचें हें संभाषण चाललें आहे इतक्यांत देवळापाशीं एकदम आरडाओरड झाली.

"पळा, पळा, वाघ सुटला. पिंजऱ्यांतून निसटला. पळा, आपले प्राण वांचवा." बागेमध्यें कांहीं हिंस्र प्राणी पिंजऱ्यांत ठेवलेले होते. त्यांतला एक भयंकर वाघ पिंजऱ्याचें

दार मोडून बाहेर पडला. कटयारीसारख्या आपल्या दातांनीं हाडें चघळीत गुहेप्रमाणें आ वासून तो भयंकर प्राणी इकडे तिकडे धांवत होता. एव्हांपर्यंत त्यानें आपल्या एकाच चपेटयांत एक माणूस, बैल व घोडा यांची शिकार करून तो त्यांच्या रक्तमांसानें लतफथला होता. त्याच्या डरकाळयांनीं सगळें आसमंत जणुं कांपत होतें.

तेवढयांत मदयन्तिकेची दासी बुद्धिरक्षिता धांपा टाकीत कामंदकीकडे आली. ती ओरडत होती, " नन्दनाची बहीण मदयन्तिका वाघाच्या तावडींत सांपडली आहे. तिला कोणी तरी वांचवा–वांचवा, धांवा–धांवा! तिच्या रक्षणासाठीं पुढें आलेल्या माणसावरहि वाघानें हल्ला केला. धांवा, "

या आरडाओरडयानें मालती घाबरून गेली. परंतु माधव मात्र एकदम पुढें होऊन वाघ होता त्या बाजूला धांवला.

पण यावेळीं इकडे नगरांत निराळीच धामधूम सुरू झाली होती. ती होती भूरिवसूची मुलगी मालती हिचें सरदार नंदनाशीं लग्न होणार त्यासाठीं. माधवाचा जिवलग मित्र मकरंद यानें नगरांत ही वार्ता ऐकली. त्याला अर्थातच वाईट वाटलें व तो ही बातमी आपल्या मित्राला सांगण्यासाठीं लगबगीनें आपल्या बिऱ्हाडाकडे आला. परंतु तेथें त्याला समजलें कीं माधव नगराबाहेर उद्यानांत

मदनोत्सवाची मौज पाहण्यासाठीं गेला आहे. तेव्हां तो तडक तिकडेच निघाला.

वास्तविक त्याला त्या दिवशीं शिवालयांत यावयाचेंच होतें. मदयन्तिकाहि तेथें येणार हें आगाऊ ठरलें होतें. कामंदकीनेंच तशी योजना केली होती. कारण त्या दोघांची लग्नगांठ बांधली जावी, अशी तिची इच्छा होती. मकरंद उद्यानापाशीं येऊन पोहोंचतो तों तेथें त्याला विलक्षणच दृश्य दिसलें. एक भयंकर वाघ एका स्त्रीच्या अंगावर झडप घालीत आहे असें त्यानें पाहिलें. तेव्हां तो धाडसी तरुण झटकन् पुढें झाला व त्यानें त्याच्यावर आपल्या हातांतील तरवारीनें असा जोरदार वार केला कीं तो चवताळून त्याच्याच अंगावर धांवून आला.दोघांचीहि चांगलीच झटापट झाली. वाघ मकरंदाच्या वारानें लवकरच मरून पडला खरा पण त्या गडबडींत त्यानें मकरंदाच्या दंडावर अशी जबरदस्त जखम केली कीं तो बेशुद्ध होऊन खालीं कोसळला. वाघाच्या मरण-मुखांतून वांचलेली ती सुदैवी स्त्री जवळच होती. तिनें तो तरुण वीर खालीं पडतोसें पाहून झटकन् त्याला सांवरलें आणि त्याला सावध करण्याचा प्रयत्न ती करूं लागली.

एवढ्या वेळांत ही गडबड ऐकून माधव तेथें येऊन पोहोंचलाहि होता. त्याच्या मागोमाग उद्यानांत असलेली

मालतीहि तेथें आपली सखी लवंगिका हिच्यासह येऊन थडकली. तिच्याबरोबरच कामंदकीहि पण आली.

मकरंदाच्या अचानक आगमनामुळें वाघाच्या तावडींतून बचावलेल्या त्या तरुणीचें नांव मदयंतिका. मालती व ती बरोबरीच्या व एकाच ठिकाणीं शिकलेल्या असल्यामुळें दोघी एकमेकींच्या चांगल्या मैत्रिणी. मालती राजाच्या आग्रहामुळें ज्या सरदाराला द्यावयाचें ठरलें होतें त्या नन्दनाची ही बहीण. परंतु उघडपणें या मैत्रिणी याबाबतींत कधीं एकमेकींशीं बोललेल्या नव्हत्या.

परंतु आजचा योगच विलक्षण होता. मकरंदाच्या शौर्यामुळें मदयंतिका वांचली एवढेंच नव्हे तर ती हृदयानें त्याचीच होऊन गेली. वास्तविक बुद्धिरक्षितेनें कामंदकीकडे माधवाबरोबर येणारा त्याचा मित्र म्हणून मकरंदाच्या गुणांचें वर्णन किती तरी दिवसांपासूनच मदयंतिकेजवळ केलेलें होतें. कारण बुद्धिरक्षिता ही तिची मैत्रीण होती. कामंदकीच्याहि मनांत मकरंद–मदयंतिकेचें लग्न व्हावें असें होतें. त्याला कारण एक तर एकमेकांना तीं अनुरूप होतीं आणि शिवाय भूरिवसूची मालती नंदनाला न मिळतां ती माधवाला मिळाल्यानें भूरिवसू व नन्दन यांच्यांत येणारें वैर यामुळें टळणार होतें. त्यामुळें कामंदकीनें आपल्या आश्रमांत मालतीसह येणाऱ्या मदयंतिकेविषयींहि पुष्कळ माहिती मकरंदाला करून दिलेली होती.

मदयंतिका त्या भयंकर संकटांतून वांचल्याबद्दल सर्वांना आनंद झाला होता. मोठ्या प्रेमानें ती सर्व मंडळी गोष्टी बोलत तेथें उभी होती. इतक्यांत मदयंतिकेच्या घरून तिचा एक नोकर तिला बोलावण्यासाठीं लगबगीनें आला. त्यानें सांगितलें, " पद्मावतीचे महाराज आत्तांच आपल्या वाड्यांत येऊन गेले. त्यांनीं भूरिवसूची कन्या मालती तुमचे बंधु नन्दन यांना द्यावयाचें ठरविलें आहे. "

मालती अशा रीतीनें आपली वहिनी होणार म्हणून मदयंतिकेला साहजिकच मोठा आनंद वाटला. त्या आनंदांतच तिनें मालतीचा निरोप घेतला. परंतु मालती–माधवांची मन:स्थिति मात्र अगदीं विलक्षण होऊन गेली. आतां हें लग्न टळत नाहीं आणि आपली लग्नगांठ कांहीं बांधली जात नाहीं अशी समजूत करून घेऊनच तीं दोघेंहि इतर मंडळींबरोबर तेथून आपापल्या ठिकाणीं परत आलीं.

परंतु नुसता तो दिवसच नव्हे तर ती रात्रहि मोठ्या विलक्षण योगायोगानें भरलेली होती.

* * *

त्या काळीं देशांत कापालिकांचा भयंकर सुळसुळाट होता. मेलेल्या माणसांच्या कपाळांच्या माळा हे लोक गळ्यांत घालीत आणि त्यांतूनच खात, पीत. त्यांचा वेष जसा बीभत्स तशी त्यांची करणीहि भयंकर. देवीपुढें

माणसांचे बळी देऊन सामर्थ्य-सिद्धि प्राप्त करून घेण्यासाठीं यांचा सतत अट्टाहास चालू असावयाचा. आणि विशेष सुलक्षणी माणसेंच ते या नरबलीसाठीं ते निवडीत.

अशा कापालिकांतील एक गुरु अघोरघण्ट म्हणून होता. तो त्या दिवसांत पद्मपुराच्या स्मशानाजवळील देवीच्या देवळांत येऊन उतरला होता. त्याचें कांहींतरी अघोर-सिद्धीचें अनुष्ठान तेथें चाललेलें होतें. आणि त्यासाठीं त्याला एक सुंदर, सुलक्षणी तरुण मुलगी देवीपुढें बळी द्यावयास हवी होती. या कापालिक गुरूबरोबर त्याची एक शिष्याहि पण होती; तिचें नांव होतें कपालकुण्डला.

त्या दिवशीं कृष्णचतुर्दशी होती. अघोरघण्टानें आपल्या सिद्धीच्या प्राप्तीसाठीं त्या अंधाऱ्या रात्रीं देवीपुढें सुंदर, सद्‌गुणी तरुणीचा बळी द्यावयाचें ठरविलें होतें. त्यानें त्याप्रमाणें कपालकुण्डलेला रात्रीं पूजेचें साहित्य घेऊन देवळांत येण्याविषयीं अगोदरच बजावून ठेवलें होतें.

रात्र झाल्यावर बळी शोधण्यासाठीं अघोरघण्ट आकाश-मार्गानें नगरांत निघाला. कर्मधर्मसंयोगानें रात्रीं आपल्या वाड्याच्या उघड्या गच्चीवर झोंपलेली मालतीच त्याच्या दृष्टीला पडली. त्या भयंकर कापालिकानें मालतीला अलगद उचलून देवीच्या देवळांत आणली आणि बळी देण्यासाठीं देवीपुढें उभी केली.

झोंपेंतून धडपडत जागी होऊन मालती डोळे उघडून पाहातें तों समोर बलिदानाच्या तयारीचें तें भीषण दृश्य. तिची भीतीनें बोबडीच वळली. एक भयंकर किंकाळी तिच्या मुखांतून साहजिकच बाहेर पडली. पण तिथें असलेला अघोरघण्ट व कपालकुण्डला यांशिवाय ती ऐकणार कोण ?

यावेळीं मालतीला माधवाची आठवण झाली. आतां आपण माधवाला, आपल्या आईवडिलांना आणि साऱ्या जगालाच कायमचें अंतरलों अशी तिची खात्री होऊन चुकली. आतां आपला रक्षणकर्ता कोणीहि उरलेला नाहीं, म्हणून ती पूर्ण निराश होऊन हताशपणें अश्रु गाळीत बसून राहिली.

“ चल हो तयार बळी जावयाला, ” कपालकुण्डला तिच्या कपाळीं मळवट भरीत म्हणाली. “ तुझें जें कोणी आवडतें माणूस असेल त्याची आठवण कर. ”

“ माधवा ! माधवा ! ” मालती असहायपणें ओरडली. “ आतां आपली गांठ स्वर्गांतच पडणार.”

अघोरघण्ट आपली तरवार परजून तयारच होता. आतां मालतीच्या मानेवर त्याचा घाव पडणार तोंच तो वरच्या वर धरला गेला.

" दुष्टा, मागें हो, गडबड करशील तर जिवानिशींच जाशील." अचानक आंत येऊन अघोरघण्टाचा हात वरच्यावर धरणाऱ्या त्या व्यक्तीनें दरडावून सांगितलें. साहजिकच विस्मित झालेल्या मालतीचें लक्ष त्या व्यक्ती-कडे गेलें आणि ओळख पटतांच " महाभागा माधवा, मला वांचवा " असें ओरडत तिनें जाऊन त्याला मिठी मारली.

माधव स्मशानांत आला होता कशासाठीं आणि त्याला कसल्या प्रसंगाला तोंड द्यावें लागलें !

उद्यानाजवळ घडलेल्या प्रसंगानंतर मदयंतिकेच्या नोकरानें आणलेल्या वार्तेवरूनच तो समजून चुकला होता कीं, आतां मालती आपली नाहीं. मग आतां हें शरीर तरी कशासाठीं ठेवावयाचें; त्याचा परोपकारार्थ तरी उपयोग करावा असा विचार करून रात्रीं कोणालाहि न कळवितां हातांत तलवार घेऊन तो स्मशानांत आला होता. माणसां-च्या अन्नाला भुकेलेल्या पिशाच्चांना आपलें मांस द्यावें आणि शरीर परोपकारीं लावावें हाच त्याचा त्यांत हेतु होता. परंतु तेथें येऊन पोहोंचल्यानंतर कांहीं वेळानें त्यानें देवळाच्या दिशेनें कोणाची तरी किंकाळी ऐकली व तो तिकडे धांवत निघाला. त्याला कल्पनाहि असणें शक्य नव्हतें कीं अशा वेळीं अशा ठिकाणीं आपली प्रिया प्राण-संकटांत सांपडलेली असेल.

मालतीला पाठीशीं घालून माधवाला प्रथम अघोर-घण्टाचा समाचार घ्यावा लागला. उभयतांच्या तरवारींचा चांगलाच खणखणाट होऊन घोरमार्गी अघोरघण्ट माधवाच्या तीक्ष्ण तरवारीला बळी पडल्यानंतरच मालतीनें खरा सुटकेचा श्वास सोडला.

परंतु इतक्यांत मालती घरांतून नाहींशी झाल्याची बातमी सर्वत्र पसरून कामंदकीपर्यंतहि जाऊन पोहोंचली होती. तिला संशय आला तो कापालिकांचाच. आणि म्हणून तिच्याच सूचनेवरून स्मशानाजवळील देवीच्या देवळाकडे भूरिवसूनें लगेच स्वार पिटाळले. जळत्या मशाली घेऊन आलेल्या त्या स्वारांनीं एकदम देवळाला वेढा दिला. परंतु त्यांना तलवार उपसण्याचें कारणच पडलें नाहीं. अघोर-घण्टाचा निकाल माधवानें अगोदरच लावलेला होता. भूरिवसूच्या शिपायांना ओळखून माधवानें मालती त्यांच्या स्वाधीन केली आणि या ‘ उपकाराची फेड करण्यासाठीं म्हणून तरी भूरिवसू आपली कन्या मला देईल ’ अशा खुळ्या समजुतींतच तो घरीं परत निघून आला.

पण झालें उलटच. या अचानक घडलेल्या चमत्कारिक घटनेमुळें मालतीच्या लग्नाची तयारी अधिक जोरानें सुरू झाली.

* * *

गोरज मुहूर्त ठरला. नन्दनाच्या कुलदेवतेचें—लक्ष्मीचें देऊळ गांवाबाहेर अगदीं स्वतंत्र अशा जागीं होतें. घराण्याच्या चालीप्रमाणें या देवळांत जाऊन भावी वधूनें पूजा करून यावयाचें होतें. त्याप्रमाणें मालती हत्तीवर बसून लक्ष्मीच्या देवळाकडे निघाली. तिचें मन जरी माधवाकडे लागलेलें होतें तरी ती पहिल्यापासूनच आज्ञाधारक असलेली मुलगी वडिलांच्या सांगण्याबाहेर जाण्यास धजत नव्हती. निमूटपणें पुढच्या सोहळ्यासाठीं ती तयार झाली !

परंतु मालती-माधवांच्या लग्नाचा प्राणपणानें निश्चय करून बसलेली कामंदकी कांहीं स्वस्थ राहिलेली नव्हती. तिच्या कारस्थानाचीं जाळीं विणलीं जातच होतीं. मालती तिची सखी लवंगिका हिच्यासह देवीच्या गाभाऱ्यांत जात असतांनाच कामंदकीनें म्हटलें, "पूजेची सगळी तयारी आहे. नंदनाकडून नववधूसाठीं आलेले वस्त्रालंकार तेवढे घेऊन मी आल्येंच."

मालती पूजेसाठीं येण्यापूर्वींच देवीच्या गाभाऱ्यांत माधव, मकरंद व त्यांचा सेवक कलहंस या तिघांनाहि कामंदकीनें गुप्तपणानें आणून लपवून ठेवलें होतें. ही गोष्ट

तिच्या दोघी शिष्यिणी बुद्धिरक्षिता व अवलोकिता आणि मालतीची सखी लवंगिका यांना माहीत होती; आणि खरें म्हणजे भूरिवसूच्या संमतीनेंच हें सर्व घडत होतें.

मालती वधूच्या पोषाखांत आंत येतांच कामंदकीनें पूर्वीं ठरल्याप्रमाणें तिचा माधवाशीं तेथेंच गांधर्व पद्धतीनें विवाह लावून दिला.

पण नुसता विवाह लावून देऊन भागण्यासारखें नव्हतें; तेथून सुखरूप निसटावयाचें कसें हा प्रश्न होताच. पण त्यांतहि कामंदकीला एका दगडानें दोन पक्षी मारावयाचे होते. तिनें आपल्याबरोबर मालतीसाठीं आणलेले नन्दना-कडील वस्त्रालंकार अंगावर चढवून माधवाचा मित्र मकरंद याला मालतीचा वेष दिला. आणि मालतीवेषधारी मकरंदच तोंडावर ओढणी घेऊन नन्दनाच्या वाड्यांत हत्तीवरून मिरवत परत आला. मग मालती व माधव हीं दोघेंच कामंदकीच्या आश्रमाकडे निघून गेलीं.

नाटकी 'मालती'चें लग्न लागलें आणि रुसलेल्या नव-वधूची समजूत काढण्यासाठीं म्हातारे नवरदेव वधूच्या शय्यागृहांत आले. माधवावर मालतीचें प्रेम आहे आणि आपल्यासारख्या वयस्कर प्रौढ बिजवराशीं लग्न करण्यास ती तयार नव्हती हें नन्दनाला माहीत होतें; त्याच

कारणासाठीं तिचा रुसवा काढावा म्हणून तो आला होता. लग्न झाल्यानंतर ती आतां आपला हट्ट सोडील अशी त्याची कल्पना होती. परंतु तिथें बुरखा घेऊन बसलेली 'मालती' कांहींच बोलत नाहीं असें पाहून तो तिला उद्देशून नाहीं नाहीं तें बोलला. 'तूं आणि तुझें कुळ वाईट चालीचें आहे,' असें बरळण्यापर्यंत त्याची मजल गेली. तेव्हां अखेर मालतीच्या वेषांतील मकरंदानें एक जोराचा धक्का देऊन नन्दनाला तेथून बाहेर ढकलून दिलें.

आपला झालेला हा अपमान नन्दनानें आपली बहीण व मालतीची मैत्रीण मदयन्तिका हिच्याखेरीज कोणालाहि सांगितला नाहीं. मदयन्तिकेला तो प्रकार ऐकून राग आला व मालतीची तिच्या या गैरवागण्याबद्दल चांगली खरडपट्टी काढावी म्हणून ती तावातावानें 'मालती' च्या खोलींत आली. परंतु तेथें असलेल्या लवंगिकेनें व बुद्धि-रक्षितेनें मकरंदाविषयीं तिचें मन मोठ्या खुबीनें समजून घेऊन मकरंदाचें नाटकी रूप उघड केलें. मकरंद-मदयन्ति-केच्या लग्नाची तयारी कामंदकीनें आपल्या आश्रमांत केव्हांचीच करून ठेवलेली होती. तेंव्हां त्या दोघांना घेऊन त्या आश्रमाकडेच निघाल्या. परंतु एव्हांना रात्र बरीच झाली होती. त्यामुळें रस्त्यावरच्या पहारेकऱ्यांनीं त्यांना अडविलें व मकरंदाला तर त्यांनीं अपशब्दहि ऐकविले. असला अपमान आणि तोहि सामान्य शिपुरड्यांकडून

ऐकून घेण्याइतका मकरंद मेंगळा नव्हता. त्यानें तिथल्या तिथेंच त्याच्याशीं दोन हात करण्यास सुरुवात केली.

कामंदकीच्या आश्रमांत यावेळीं मालती व माधव हीं दोघेंच मकरंद-मदयन्तिका तेथें येण्याची वाट पाहात थांबलेलीं होती. मकरंदाबरोबर असलेल्या माणसांकडून कामंदकीच्या आश्रमांत माधवाला ही चकमकीची हकीकत समजतांच तो आपली तलवार सरसावीतच तेथें धांवून आला. त्या दोघां तरुणांनीं तेथें जमलेल्या दहा-पंधरा शिपायांना लवकरच पळावयास लाविलें. आणि मग सर्व मंडळी कामंदकीच्या आश्रमांत येऊन पोहोंचली. पण माधवानें एकटीच सोडलेली मालती तिथें होती कोठें ?

शोध करूनहि मालती सांपडत नाहींसें पाहून पुन्हा सर्वत्र हाहाःकार उडाला !

* * *

आपला गुरु अघोरघण्ट याची इतिश्री करणाऱ्या माधवाचा सूड उगविण्यासाठीं कपालकुण्डला संधी शोधीत होती. त्या रात्रीं कामन्दकीच्या आश्रमाभोंवतीं घिरट्या घालणाऱ्या त्या कापालिकेला आश्रमांत मालती एकटीच आहेसें पाहून फार बरें वाटलें. तिनें लगेच तिची बकोटी धरली व ती तिला कड्यावरून लोटून देण्यासाठीं तेथून

घेऊन गेली. " तूं नाहींशी झालीस म्हणजे माझ्या गुरूला ठार मारणारा तुझा माधवहि तुझ्या विरहाच्या दुःखानें तुझ्या मागोमाग येईल. कड्यावरून उडी घेऊन जीव देईल. मग मला बरें वाटेल. " कपालकुण्डला विकटपणें हंसून तिला म्हणत होती.

परंतु अगदीं ऐन वेळीं एक तपस्विनी तिथें आली व तिनें कपालकुण्डलेपासून मालतीचें रक्षण करून तिला आपल्या आश्रमांत ठेवून घेतलें.

मालती नाहींशी झालेली पाहून माधव वेडापिसा होऊन नगराबाहेर अरण्यांत हिंडत होता. तेथेंच त्यानें आत्महत्त्या करण्याचाहि विचार चालविला होता. तो या जगांतून जाणार म्हणून त्याचा परममित्र मकरंदहि त्याच्या मागें जीव देण्यास निघाला होता. परंतु त्या तापसीनें अगदीं ऐन वेळीं येऊन मालतीचे प्राण वांचविले, तसेच ती आपल्या आश्रमांत सुखरूप असल्याचें सांगून तिनें या दोघां तरुणांचेहि जीव वांचविले. मालतीनें सांगितलेल्या खाणाखुणांवरून तिनें माधव-मकरंदाचाहि शोध काढला, इतकेंच नव्हे तर मालतीच्या नाहींसें होण्यामुळें दुःखी झालेला भूरिवसूहि नदी–संगमावर स्वतःला जाळून घेऊन प्राणत्याग करीत होता त्यालाहि आयत्या वेळीं जाऊन वांचविला.

कामन्दकीची तर मालतीवर विलक्षण माया; लवंगिका तिची सखी. तेव्हां त्याहि मालती सांपडत नाहींसें पाहून जीव द्यावयाच्याच तयारींत होत्या. मदयन्तिकाहि त्यांच्याच मार्गाचा अवलंब करीत होती. इतक्यांत त्या तपस्विनीच्या साहाय्यामुळें वांचलेलीं तिघेंहि–मालती, माधव व मकरन्द–कामन्दकी इतर दोघींसह कड्यावर जाऊन बसलीं होतीं त्या ठिकाणीं आलीं.

तीं सर्वजण तेथें एकत्र जमतात तोंच त्यांना समजलें कीं मालतीच्या दुःखानें भूरिवसू संगमावर स्वतःला जाळून घेत आहे. परंतु त्यानें आपल्या जिवाचें कांहीं बरें वाईट करून घेण्यापूर्वीं त्याला मालती सुखरूप असल्याचें कसें कळविणार? कारण संगम तर तेथून बराच दूर होता. परंतु इतक्यांत त्या सर्वांच्या आनंदाला कारण झालेली ती अनोळखी तपस्विनी कामन्दकीला नमस्कार करीतच त्यांच्यापुढें येऊन अकस्मात उभी राहिली.

ती तपस्विनी म्हणजे श्रीपर्वतावर योगाभ्यास करण्यासाठीं निघून गेलेली सौदामिनी होती. तिनें भूरिवसूच्या जिवाला कांहींहि अपाय नसल्याचें सांगून राजानें नन्दनाची बहीण मदयन्तिका मकरन्दाला अर्पण केल्याचा निरोपहि त्या सर्व मंडळींना कळविला. पहारेकरी शिपायांशीं

लढतांना माधव–मकरंदांनीं जो पराक्रम प्रकट केला होता त्यावर राजा खूष झाला होता. त्याचेंच हें फळ होतें.

पद्मावतीच्या विद्यापीठांतून बाहेर पडतांना भूरिवसू, देवरात, कामन्दकी व सौदामिनी यांनीं केलेला एक सत्संकल्प अशा रीतीनें तडीला गेला.

संस्कृत साहित्य सरितेचीं पुस्तकें

८

१. रघुवंश
२. शाकुन्तल
३. विक्रमोर्वशीय
४. मृच्छकटिक
५. प्रतिमा
६. महावीरचरित
७. उत्तररामचरित
८. मालतीमाधव
९. स्वप्नवासवदत्ता
१०. दशकुमारचरित : भाग १
११. दशकुमारचरित : भाग २
१२. वेणीसंहार
१३. कुमारसम्भव
१४. मालविकाग्निमित्र
१५. हर्षचरित
१६. नागानंद
१७. पंचरात्र
१८. रत्नावली
१९. कादम्बरी
२०. मेघदूत
२१. शिशुपालवध
२२. किरातार्जुनीय
२३. बुद्धचरित
२४. मुद्राराक्षस
२५. प्रतिज्ञायौगंधरायण
२६. अविमारक
२७. अभिषेक
२८. मध्यमव्यायोग
२९. कर्णकार
३०. उरुभङ्ग
३१. पार्वतीपरिणय
३२. नलोदय

प्रत्येकी किंमत ६ आणे

६ आणे

वोरा ॲन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि०

